**<u>निशाणी—५तसेच प्रतिवादींच्या प्रतिदाव्यातील मनाई हुकुमाच्या मागणीच्या अर्जावर सामाईक आदेश</u>**

(.......आज रोजी दिनांक ०३ आक्टोंबर, २०१५........)

०१. प्रस्तुतचा अर्ज नि.५ हा वादी प्रतिवादी यांनी अथवा त्यांच्या मार्फत कोणत्याही इसमांनी वादीच्या वाद मिळकतीच्या कब्जा व उपभोगास हिल्ला हरकत करू नये, याकरीता तात्पुरता मनाई हुकूमासाठी सादर केला आहे. तसेच प्रतिवादी यांनी कैफियतीमध्ये प्रतिदावा सादर करुन त्याद्वारे वादीने वाद मिळकतीवर प्रतिवादींचा असलेला कब्जा बेकायदेशीपणे घेवू नये, असा तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी केली आहे.

०२. अर्जातील वादीचे कथन संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

मौजे पिंपळे बुद्रुक ता. कळवण येथील जि.नाशिक येथील शेतजमिन गट नं. ७९ यासी क्षेत्र ०१ हेक्टर ४९ आर यासी चतु:सिमा पुर्वेस— गट नंबर ८४,पश्चिमेस गट नंबर ८०, दक्षिणेस गट नंबर १०४ व उत्तरेस गट नंबर २६ व रस्ता ही मिळकत असुन याबाबत वाद आहे. (करीता या मिळकतीबाबत वाद असल्यामुळे सोईकरीता या मिळकतीस ‘वाद मिळकत’ असे संबोधन्यात येत आहे.)

०३. वादीच्या अभिकथनाप्रमाणे, वाद मिळकत ही पांडु ताथु नाईक (बोरसे ) व लक्ष्मण अर्जुन नाईक (बोरसे) यांच्या मालकिची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची मिळकत होती. दिनांक ०४.०७.२०१३२ रोजी वादी यांनी पांडु ताथु व लक्ष्मण अर्जुन यांच्याबरेबर वाद मिळकत खरेदी करण्याचा सौदा केला त्याप्रमाणे साठेखत करारनामा लिहीण्यात आला व तो दुय्यम निबंधक, कळवण यांच्या कार्यालयात दस्त क्रमांक ९४४/१३ प्रमाणे नोंदविण्यात आला. त्यानंतर वाद मिळकतीचा नजराणा भरुन मिळकतीचे इमान स्वरुपात बदल करुन आवश्यक असलेली परवानगी घेंतली व त्याप्रमाणे पुर्नवसनाची परवानगी घेवुन

मिळकतीचे ठरलेल्या बाजारभावाप्रमाणे मुल्य अदा करुन वाद मिळकतीचे दिनांक ११.१०.२०१३ रोजी कायम फरोक्त खरेदी खत करण्यात आले व सदरचे खरेदीखत हे दुययम निबंधक कळवण यांच्या कासार्ईलयात अ.नं. १४१६/२०१३ ला नोंदविण्यात आले व खरेदीखताप्रमाणे मिळकतीचा ताबा जमिनीचे मालक पांडु ताथु नाईक (बोरसे) व लक्ष्मण अर्जुन नाईक (बोरसे) यांनी वादीला दिला व तेव्हापासुन वाद मिळकत ही वादी यांच्या प्रत्यक्ष कब्जावहिवाटीत आहे. त्यानंतर रेकॉर्ड ऑफ राईटला नोंद होवुन नोंद नं. ३२८ ला वाद मिळकतीवर वादीचे नांव लागले. प्रतिवादींचा दावा मिळकतीशी काहीएक संबंध नाही व केवळ ते जमिन विक्री कीणारांचे जातभाई आहेत व या गोष्टीचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी हे वादीच्या मालकीहक्कास हिल्लाहरकत करु लागले. त्यानंतर वादीने दिनांक ०६.११.२०१३ रोजी त्याबाबत हरकतली नोंदविली तसेच प्रतिवादींविरुद्ध पोलीस तक्रार दाखल केली परंतु प्रतिवादी हे बेकायदेशीरपणे कायदा हातात घेवुन वादी यांच्या वाद मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत प्रतिवादींचा वाद मिळकतींशी काहीही संबंध नाही. प्रतिवादींच्या कृत्यामुळे वादीच्या हक्कास बाधा निर्माण होईल तसेच वादीचे कधीही भरून न येणारे नुकसान होईल. याउ्लट प्रतिवादींचे कुठलेही नुकसान होणार नाही. करीता वादीला सदरचा अर्ज प्रथमदर्शनी सिद्ध केला असुन न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे अर्ज खर्चासह मागणीप्रमाणे मंजुर करावा, अशी विनंती अर्जात केली आहे.

०४. प्रतिवादी क्र.१ ते १४ यांनी (नि.१७) प्रमाणे कैफियत दाखल केली. प्रतिवादींनी वादीचा दावा पुर्णत: नाकारला आहे. प्रतिवादींचे अभिकथन की दावा मिळकत ही प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत मालकिची असुन त्यात पांडु ताथु व लक्ष्मण अर्जुन यांच्याबरोबर प्रतिवादींचा सुद्धा प्रत्यक्ष कब्ला आहे व ते सदर मिळकत मालकी हक्काने खेडीत आहेत. दावा मिळकत पांडु यांच्या एकटयाचे मालकिची व प्रत्यक्ष कब्जाची नाही. वाद मिळकतीवर प्रतिवादींचा कब्जा असुनही तसेच वाद मिळकत ही प्रतिवादींची वडीलोपार्जीत मिळकत

आहे ही बाब वादी यांना माहित होती व केवळ दांडुबळीने वादी यांनी वाद मिळकतीवर कब्जा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चालविला आहे. तसेच दाव्याची आकारणी वादीने चुकीची केली असुन ती प्रतिवादींना मान्य नसल्याचे कथन केले आहे. तसेच वादी यांना वाद मिळकत खरेदी करण्यापुर्वी प्रतिवादी यांनी वादीला त्यांच्या हक्काबाबत व कब्जाबाबत लेखी स्वरुपात कळविले होते परंतु वादीने बेकायदेशीरपणे सदरचे खरेदीखत नोंदविले आहे व वादी हे बोनाफाईड पर्चेसर नाहीत. तसेच दाव्यात वादीने आवश्यक ते सर्व पक्षकार सामिल केले नसल्यामुळे दाव्यास नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीज या तत्वाचा बाध आहे.

०५ प्रतिवादींनी सदर दाव्यात प्रतिदावा दाखल करुन उलट मागणी केली आहे ती म्हणजे दावा मिळकत ही पांडु ताथु व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत मालकीची व प्रत्यक्ष कब्जातील आहे. कैफियतीत नमुद वंशवृक्षाप्रमाणे मुळ पुरुष गंगाराम नाईक यास तान्या व आन्या अशी दोन मुले होती. गंगाराम नाईक मयत झाल्यानंतर तान्या व आन्या त्यास वारस होते पैकी तान्या यास ताथा, बापु,हरी,गंगाजी व देवराम अशी पाच मुले होती व त्याप्रमाणे रेकॉर्ड ऑफ राईटला त्यांची वारस म्हणुन नोंद झाली आहे व रेकॉर्ड ऑफ राईटसला नोंद नं.२७२ मंजुर झाली. त्यान्या याचा वडील मुलगा ताथ्या हा देखील मयत झाल्याने त्याचे वारस म्हणुन पांडु याचे नांव रेकॉर्ड ऑफ राईटसला लागले आहे. परंतु पांडु हा वडील मुलगा असल्यामुळे व कुटुंबातील कर्ता असल्यामुळे सातबारा रेकॉर्डला फक्त पांडुचेच नांव लागले होते. पांडु याने वाद मिळकत वादीला विक्री केली आहे. ताथा याचा दुसरा मुलगा बापु हा मयत झाल्यामुळे त्यास पुनाजी हा मुलगा होता व पुनाजी मयत असुन त्यास सिताराम, काळु,भागाबाई, विमलबाई व कमळाबाई अशी मुले होती पैकी सिताराम हा दाव्यातील प्रतिवादी असुन वादीने दाव्यात सितारामचे नांव सिताराम पुनाजी ऐवजी सिताराम गुणाजी असे चुकीचे लिहीले आहे व सिताराम गुणाजी नावाची कोणीही व्यक्ती गावात नाही. तसेच ताथ्या याचा तिसरा मुलगा हरी हा होता व हरी मयत झाल्यानंतर त्यास रंगनाथ,हिरामण, शांताराम,परशराम,सुमनबाई,साक्रीबाई अशी मुले होती त्यापैकी परशराम हा

मयत असुन त्यास बाबुलाल हा मुलगा आहे तो या दाव्यातील प्रतिवादी क्र.१० आहे तसेच हरी याचा मुलगा रंगनाथ हा प्रतिवादी क्र. ८ असुन हिरामण हा प्रतिवादी क्र. ९ आहे. तान्या यांस गंगाजी हा चौथा मुलगा असुन त्यास लक्ष्मण, रामदास काशिराम (बाळु),मोहनाबाई व कमळाबाई अशी मुले आहेत. तान्या यास पाचवा मुलगा देवराम असुन देवराम हयात आहे व त्यास महारु (प्रतिवादी क्र.१) असुन रेशमाबाई ही त्याची पत्नी आहे व ती प्रतिवादी क्र.३ आहे. गंगाराम याचा दुसरा मुलगा आन्या हा होता तो मयत असुन त्यास दौलत व रामचंद्र अशी मुले आहेत पैकी दौलत हयात असुन तो दाव्यातील प्रतिवादी क्र.६ आहे व सगुनाबाई ही दौलत याची पत्नी असुन ती प्रतिवादी क्र.७ आहे. दौलत व सगुनाबाई यांना काशिराम हा मुलगा असुन तो प्रतिवादी क्र.२ आहे व काशिराम यास भास्कर व हरिश्चंद्र अशी दोन मुले असुन ते अनुक्रमे प्रतिवादी क्र. ४ व ५ आहेत येणेप्रमाणे गंगाराम नाईक यांचा वंशवृक्ष असे.

०६ पांडु हा ताथा याचा वडील मुलगा असल्याने व घरातील कर्ता पुढारी असल्याने रेकॉर्ड ऑफ राईटसला फक्त त्याचे एकटयाचेच नाव लागले असल्याचा गैरफायदा घेवुन पांडु याने सदरची मिळकत ही वादी यास विक्री केली आहे. परंतु सदर मिळकतीत पांडुबरोबरच प्रतिवादी यांचा वंशवेलीत वर्णन केलेल्यांचा हिस्सा आहे व सदरील जमिन ही प्रतिवादी यांच्या प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीत आज रोजी आहे व प्रतिवादी हे मालकी हक्काने ज्याची त्याची हिश्याची जमिन तोंडी वाटपाप्रमाणे खेडीत आहेत. केवळ वाटपाप्रमाणे प्रतिवादी यांची नावे मिळकतीच्या सातबारा उता—याला लागलेली नाहीत परंतु सदर मिळकतीत त्यांचा अविभक्त हिस्सा आहे. त्यामुळे जोपर्यंत प्रतिवादींचा हिस्सा अलग व तुटक होत नाही तोपर्यंत पांडु यास एकटयाला मिळकत विक्री करण्याचाअधिकार नाही.

०७ सबब प्रतिदाव्यातील उलट मागणीनुसार पांडु याने वाद मिळकतीचे विक्रीचे केलेले खरेदीखत हे बेकायदेशीर असुन ते प्रतिवादींवर बंधनकारक नाही, असा ठराव करुन मिळण्याची तसेच प्रतिवादी हे वाद मिळकतीत पिकपेरा

करुन उत्पन्न घेत आहेत व वाद मिळकतीवर त्यांचा प्रत्यक्ष कब्जा आहे त्यामुळे वादी यांनी बेकायदेशीररित्या जमिनीचा कब्जा घेवु नये, अशी वादीला निरंतराची ताकीद दयावी अशी प्रतिवादी यांनी उलट मागणी केली आहे. तसेच प्रतिवादींचे अभिकथन की वादी यांनी प्रस्तुत दाव्यात निशाणी ५ चा अर्ज देवुन प्रतिवादीविरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी केली आहे. दावा मिळकत ही प्रत्यक्षपणे प्रतिवादी यांच्या कब्जात असुन जर वादी यास मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादी यांचा जमिनीवरील कब्जा जावुन त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल. प्रतिवादी यांना वाद मिळकतीशिवाय अन्य मिळकती नाहीत त्यामुळे त्यांच्यावर भुमीहीन होण्याची वेळ येईल. याउ्लट वादीचे वाद मिळकतीचे खरेदीखत हे बेकायदेशीर असल्याने वादीचे काहीही नुकसान होणार नाही.त्यामुळे प्रतिवादींनी प्रतिदाव्याच्या आधारे त्यांच्या ताब्यातील वाद मिळकतीचा बेकायदेशीर रित्या कब्जा घेवुनये म्हणुन वादीविरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी केली आहे.

०८ प्रतिवादींनी दाखल केलेल्या प्रतिदाव्याला वादीने कैफियत दाखल केली त्यात वादीने प्रतिवादींचा प्रतिदावा पुर्णतः नाकारला आहे व त्यांनी असे अभिकथन केले की वाद मिळकत ही वडीलोपार्जीत नव्हती व सदर मिळकत इनाम वर्ग ६ ची जमिन होती मात्र ती प्रतिवादी अगर त्यांच्या पुर्वजांच्या कब्जात नव्हती व ती त्रयस्थ इसम करीत होते त्यामुळे नोंद क्रमांक २६१ चे कब्जेदार देवकु मंजी यांचे नाव लागले होते मात्र इनाम जमिनींना कुळ लागत नसल्याने नोंद क्रमांक २६१ ने ते कमी झाले. त्यानंतर सन १९५८ मध्ये इमान खालसा करण्याचा कायदा अस्तित्वात आला त्यावेळी वाद मिळकत पांडु ताथु, अर्जुन पापा यांच्या कब्जात होती त्यामुळे मिळकतीचे मालकी हक्क सदरी सरकारचे नांव दाखल करण्यात आले व कब्जेदार इनामदार म्हणुन पांडु ताथु, अर्जुन पापा यांचे नांव लागले त्यावेळी कब्जाही त्यांचाच होता व त्याबाबत नोंद क्र.४३३अ ही दाखल करण्यात आली आहे. दरम्यान दिनांक १२.११. १९६४ रोजी पांडु ताथु व अर्जुन यांनी सरकारी आकाराचे पर्यंत रक्कम

सरकारला जमा केल्याने त्यांच्याच नावे जमिनी रिग्रॅन्ट करण्यात आल्या व त्याबाबत नोंद क्र. ५४१ ही झालेली आहे. दरम्यान अर्जुन पापा मयत झाला व नोंद क्र. ७ ने त्याचे वारस लक्ष्मणचे नांव रेकॉडला लागले. अशा रितीने रिग्रॅन्ट नंतर वादमिळकत ही पांडु नाथु व लक्ष्मण अर्जुन यांचे नावे लागली व मे. जिल्हाधिकारी नाशिक यांची परवानगी घेवुन ती मिळकत वादी यांना विक्री केली आहे व अशारितीनेजमिन ही योग्य व कायदेशीर टायटल व पझेशन आहे व असे असतांनाही प्रतिवादी यांनी बेकायदेशीर मार्गाने कब्जा करण्याचा प्रयत्न केला असुन वादींना त्रास देण्याचा प्रयत्न करीत आहेत करीता वादींनी प्रतिवादींचा प्रतिदावा व मनाई हुकुमाची मागणी रद्द करावी ही विनंती केली आहे

०९. अर्ज (नि.०५),प्रतिवादी क्र. १ ते १४ यांची कैफियत व प्रतिदावा(नि.१७) व प्रतिवादींच्या प्रतिदाव्याला वादी यांनी दिलेला जबाब (नि. १९) तसेच वादींच्या विधिज्ञांनी मांडलेला युक्तीवाद लक्षात घेता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ रूल १ लक्षात घेवून खालील मुद्दे निश्चित करुन त्यावरील कारणमिमांसा निष्कर्षासह खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| **मुद्दे.** | | **नि ष्क र्ष.** |
| --- | --- | --- |
| (१) कोणी प्रथमदर्शनी केस सिध्द् केली आहे ? | .... | वादीने |
| (२) न्यायाचा समतोल कोणाच्या बाजुने आहे? | .... | वादीच्या |
| (३) तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज मंजुर केला तर कोणाचे अतोनात नुकसान होईल काय? | .... | वादीचे |
| (४) आदेश काय? | .... | अंतिम आदेशाप्रमाणे |

# <u>कारणमिमांसा</u>

## <u>मुददा कं.१ ते ३ बाबत :—</u>

१०. उपरोक्त सर्व मुद्दे ऐकमेकांशी निगडीत असल्यामुळे लांबण टाळण्यासाठी चर्चेकरीता एकत्रीत घेण्यात येत आहे. वादीच्या अभिकथनाप्रमाणे, वाद मिळकत ही पांडु ताथु व लक्ष्मण अर्जुन यांनी दिनांक ११.१०.२०१३ रोजी कायम फरोक्त खरेदीखताने दस्त क्रमांक ९४४/१३ अन्वये विकत घेतली असुन तेव्हापासुन वादीचा वादमिळकतीवर ताबा असुन त्यांची वहिवाट आहे व त्याप्रमाणे महसुल विभागात नोंद क्र.३२८ झाली आहे. प्रतिवादींचा वादमिळकतीशी काहीही संबंध नाही. प्रतिवादी हे जमिन विक्री करणा—यांचे जातभाई आहेत याचा गैरफायदा घेवुन ते वादीच्या वादमिळकतीच्या मालकी हक्कास हरकत अडाथळा करीत आहेत त्यामुळे प्रतिवादींविरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती वादीने केली आहे.

११. सदर तथाकथित अभिकथनाच्या पुष्टयार्थ वादीने निशाणी ३च्या दस्तऐवज यादीसोबत ८अ खातेउतारा व सातबारा उतारा तसेच खरेदीखताची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. यासर्व कागदपत्रांचे लक्षपुर्वक अवलोकन केले असता सकृतदर्शनी एक बाब सिद्ध होते की वादीने वाद मिळकत खरेदी खत नोंद क्र. ९४४/१३ अन्वये खरेदी केली असुन सातबारा उता—यावरुन आज रोजी वाद मिळकत ही वादीचे ताबे वहिवाटीत आहे.

१२ प्रतिवादींनी असा ठोस बचाव घेतला आहे की वाद मिळकत ही प्रतिवादींची वडीलोपार्जीत असुन त्यात पांडु ताथु व लच्मण सोबत त्यांचा प्रत्य क्ष कब्जा होता/आहे. पांडुचे नांव एकत्र कुटुंबाचा कर्ताम्हणुन लागले होते.

सदरचे खरेदीखत प्रतिवादींच्या हिशावर बंधनकारक नाही. वाद मिळकत सर्व प्रतिवादी तोंडी वाटपाप्रमाणे जो तो मालकी हक्काने त्याच्या हिश्याप्रमाणे वहिती करीत आहेत. वादीचा वाद मिळकतीवर कब्जा नव्हता/नाही. यावरुन सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादींनी करून त्यांचा वाद मिळकतीवर कब्जा वादीने बेकायदेशीरपणे घेवू नये, अशी तुर्तातुद ताकीद दयावी, अशी विनंती केली आहे. या तथाकथित बचावाच्या पुष्टयार्थ प्रतिवादींनी (नि.२७)च्या सोबत जन्म—मृत्यु दाखले, खालसा जमिनींचे धारण करणार व कब्जा असलेले स्थानापनांची यादी इ. कागदपत्रे सादर केले आहेत. या ठिकाणी एक बाब स्पष्ट करण्यात येत आहे की, वादीने प्रतिवादींशी असलेले नातेसंबंध नाकारलेले नाहीत. तसेच नोंद क्र. २७२ वरुन वाद मिळकत ही पुर्वी वारसाने तान्हा गंगाराम नाईक यांची होती व त्याच्यानंतर त्यांची चार मुले व नातुपैकी एक पंडीत मुलगा हा मयत वारस असुन त्याचा नातु पांडु ताथु हा आहे व वाद मिळकतीवर सामाईक कब्जेदार आहेत, ही बाब नोंद क्र.२७२ या कागदपत्रावरुन सकृतदर्शनी सिद्ध होते. परंतु सदरची नोंद पहाता ती दिनांक २७.०९.१९५२ रोजीची असुन त्यानंतर नोंद क्र.४३३ अ नुसार दिनांक ११.५.१९५९ रोजी खालसा झाल्याने मुंबईचा हलकेगांव नोकर वसुली नष्ट करण्याचा कायदा सन १९५९ असुन तो दिनांक ०२.०१.१९५९ पासुन अमलांत आल्याने वाद मिळकत ही सदरहु वतनाच्या जमिनी इनामापासुन कमी करुन दिनांक ०१.०२. १९५९ पासुन खालसा करण्यात आली व त्याप्रमाणे भर आकार बसवुन सरकारचे नांव दाखल करण्यात आले. यावरुन वाद मिळकतीवर पांडु, अर्जुन, धेंडु व देवाजी यांची नावे नोंद क्र.४३३—अ या हक्कपत्रातुन कमी करण्यात आल्याचे सकृतदर्शनी सिद्ध होत आहे.

१३. सर्वात महत्वाचे म्हणजे नोंद नं.२७२ प्रमाणे पांडु व ल्क्ष्मण यांची नावे सामाईक कब्जेदार म्हणुन वारसाने लागली हे या ठिकाणी सकृतदर्शनी सिद्ध होत असले तरी त्यानंतर नोंद क्र.५४१ नुसार रिग्रॅन्ट मुळे नविन अविभाज्य शर्थीने तीन पट रुपये भरुन ती जमिन पांडु, अर्जुन,धोंडु व

देवाजी यांच्या नावाची नोंद झाली असल्याचे सकृतदर्शनी निर्दशनास येते. तसेच ज्याप्रमाणे नोंद क्र. ५४१ नुसार एकत्रित केलेल्या जमिनींच्या पत्रकात सुद्धा पांडु, धोंडु व अर्जुन यांचे नांव मालकी सदरी असल्याचे सकृतदर्शनी निर्दशनास येते तसेच एकत्रीकरणाच्या जमिनी दर्शविणा—या पत्रकात नविन अटी शर्ती असा शेरा नमुद केला आहे. या दोन्ही पक्षकारांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन एक बाब स्पष्ट होते की नोंद क्र. ५४१ नुसार वाद मिळकती पांडु, धोंडु व अर्जुन यांच्या नावाने नोंद होवुन ती त्यांना रिग्रॅन्ट करुन नविन अविभाज्य शर्तीने दिली आहे परंतु या तिघांचीही नावे वारस अथवा कुटुंब कर्ता म्हणून लागली असा उल्लेख नोंद क्र.५४१ मध्ये नाही.

१४. याखेरीज आज रोजी वाद मिळकतीवर मालकी हक्क कोणाचा आहे? वाद मिळकत ही वडीलोपार्जीत मिळकत आहे? खरेदीखत पोकळीस्त आहे? जर हो तर, ते प्रतिवादींच्या हिस्स्यापुरतं बंधनकारक नाही? नोंद नं.५४१ मुळे प्रतिवादींच्या हिस्स्यांना काही बाधा निर्माण होत नाही? हे सर्व मुद्दे तोंडी युक्तीवादावरुन निकाली लावणे अशक्य आहे त्यामुळे सदरचे मुद्दे हे पुढील कामकाजात गुणगुणांवर पुराव्यानिशी निकाली लावण्यात येईल.

१५ करीता, प्रतिवादींचा वाद मिळकतीवर त्यांच्या हिस्से प्रमाणे कब्जा आहे, हे सिद्ध करण्यासाठी प्रतिवादींनी एकही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. तसेच नोंद क्र. ५४१ रिग्रॅन्ट झाल्यामुळे वाद मिळकत पांडु अर्जुन व धोंडु यांच्या स्वतंत्र मालकी कब्जे वहिवाटीत असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध होत आहे. तसेच नोंद क्र. ५४१ ही आजही अस्तित्वात असुन त्या विरुद्ध प्रतिवादींनी अपिल केले अथवा ती नोंद रद्द होवुन त्या जागी नविन नोंद झाली, हे दाखविण्यासाठी कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. सबब, आज रोजी नोंद क्र.५४१, एकत्रीकरण योजना, खरेदीखत व सातबारा उता—यावरुन आज रोजी वाद मिळकतीवर वादीचा ताबा असुन वादीच्या मालकी हक्कात आहे हे वादीने सकृतदर्शनी सिद्ध केले. यास्तव प्रतिवादींनी लेखी कैफियतीमध्ये वाद

मिळकतीवर त्यांचा कब्जा वहिवाट असल्याचे नमुद केल्यामुळे निश्चितच प्रतिवादी वादीच्या कबजावहिवाटीस हरकत करीत आहे हे सिद्ध करण्यसाठी वादीला आणखी पुरावा सादर करण्याची आवश्यकता नाही. तसेच प्रकरणात दाखल कागदपत्रांवरुन न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असुन वादीचा ताबा वाद मिळकतीवर असल्यामुळे तुतातुर्त मनाई हुकुन न दिल्यास वादीचे नुकसान होणार आहे. याखेरीज प्रतिवादींचा वाद मिळकतीवर ताबा आहे, ही बाब प्रतिवादी सकृतदर्शनी सिद्ध करण्यास असमर्थ ठरले व अर्ज मंजुर केल्यास त्यांना नुकसानाची संभावना दिसुन येत नाही या उलट अंतिम निकालाच्यावेळी वाद मिळकतीत प्रतिवादींचा हिस्सा आहे असा निष्कर्ष लागल्यास प्रतिवादी वाद मिळकतीचा परत ताबा वादीकडुन घेवु शकतात. परिणामी, उपरोक्त कारणांस्तव, मुददा क्र.१ ते ३चे उत्तर वादींचे लाभांत नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुददा क. ४ बाबत :—</u>**

१६. मुददा क्र. १ ते ३ च्या वादीच्या लाभात होकारार्थी उत्तरामुळे वादीचा अर्ज निशाणी—५ मंजुर होण्यास पात्र ठरतो. तसेच दोन्ही पक्षकारांना सदर दाव्याच्या पुढील कामकाजाच्या खर्चास सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे अर्जाचा खर्च दाव्यासोबत लावण्यात येत आहे. सबब, मुददा क्र.४ च्या निष्कषार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (नि.५) मंजुर करण्यात येत आहे.

२. (नि.१७) तुर्तातुद मनाई हुकूमाची मागणी खारीज करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी यांनी अथवा त्यांच्या मार्फत कोणत्याही इसमांनी वादीच्या वाद मिळकतीच्या वहिवाटेस व मालकीहक्कास हिल्ला हरकत करू
नये, असा तुर्तातुद मनाई हुकूम दाव्याचा अंतिम निकाल लागे पर्यंत देण्यात येत आहे.

४. अर्जाचा खर्च दाव्यासोबत.

दिनांक.०३.१०.२०१५.

(एस.पी.पैठणकर),
सह दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर), कळवण.
ता.कळवण, जि.नाशिक.